राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे, महाराष्ट्र

# राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धा

सन २०२१- २२

गट क्रमांक - ४ - विषय सहाय्यक, विषय साधन व्यक्ती, समावेशित साधन व्यक्ती, विशेष साधन व्यक्ती, विशेष शिक्षक व ग्रंथपाल गट.

शीर्षक

# 'व्यावसायिक वाटा .........प्रगतीच्या दिशा '

## (विविध क्षेत्रातील व्यावसायिकांची मुलाखत)

सादरकर्ता

श्रीम. अर्चना यदुनाथ जोशी

(समुपदेशक, विषय सहाय्यक)

प्रादेशिक विद्या प्राधिकरण, मुंबई.

# अनुक्रमणिका



| अ. क्र. | तपशील | पान क्रमांक |
|---|---|---|
| १ | ऋणनिर्देश | 3 |
| २ | नवोपक्रमाचे शीर्षक | 4 |
| ३ | नवोपक्रमाची गरज व महत्त्व | 4 व 5 |
| ४ | नवोपक्रमाची उद्दिष्टे | 5 |
| ५ | नवोपक्रमाचे नियोजन | 5 ते 9 |
| ६ | नवोपक्रमाची कार्यपद्धती | 9 ते 12 |
| ७ | नवोपक्रमाची यशस्विता/फलनिष्पत्ती (उद्दिष्टानुसार) | 13 |
| ८ | समारोप | 13 |
| ९ | संदर्भसूची व परिशिष्टे | 14 ते 27 |

## ऋणनिर्देश

सदर नवोपक्रम राबवितांना नवोपक्रमकर्त्याला अनेकांची मदत झाली आहे. याबाबत ऋण व्यक्त करणे हे माझे कर्तव्य आहे. मी अर्चना जोशी समुपदेशक/ विषय सहाय्यक म्हणून प्रादेशिक विद्या प्राधिकरण मुंबई येथे प्रतिनियुक्तीने कार्यरत आहे.

या उपक्रमासाठी प्रादेशिक विद्या प्राधिकरण मुंबईच्या मा. श्रीमती मनीषा पवार उपसंचालक, मा.श्रीमती संघमित्रा त्रिभुवन व्यवसाय मार्गदर्शन अधिकारी यांच्याकडून मला प्रेरणा व मार्गदर्शन मिळाले. अधीक्षक मा.मृणाल पोतदार यांनी नेहमीच उपक्रमाला पाठिंबा दिला, तसेच मुलाखत देखील घेतली. कार्यालयातील समुपदेशक श्री यतीन पोळ, श्रीमती अनुजा कदम, श्री विनोद घोरपडे व विषय सहाय्यक श्रीमती वैशाली काकडे, श्रीमती नम्रता परब, श्रीमती मानसी भोसले तसेच विषय साधन व्यक्ती श्रीमती शितल शिर्के, विशेष साधन व्यक्ती श्रीमती सुप्रिया कांबळे यांनी मुलाखत घेऊन सहकार्य केले. तसेच IVGS चे समुपदेशकांनी या उपक्रमामध्ये मुलाखतकार म्हणून मोठी भूमिका निभावली. त्या सर्वांचे मी मनापासून आभार मानते.

श्री .शिवाजी रेणापुरे विषय सहाय्यक यांनी मुलाखत युट्युब वर अपलोड करण्याचे काम पाहिले, त्यांचेही मी मनापासून आभार मानते. तसेच माझ्या कुटुंबातील सदस्य ऋत्विज जोशी, तन्मय देशपांडे व अंबरिश जोशी यांनी तांत्रिक सहाय्य करून या उपक्रमासाठी मोलाचे सहकार्य केले. या उपक्रमांतर्गत १०२ मुलाखती मधून मोलाची माहिती देणारे सर्व तज्ज्ञ मार्गदर्शक यांचे मी मनापासून आभार मानते. या सर्वांशिवाय हा उपक्रम यशस्वी होणे अशक्य होते या सर्वांचे पुनश्च ऋण व्यक्त करते. सर्वांचे आभार.



श्रीम. अर्चना यदुनाथ जोशी
(समुपदेशक, विषय सहाय्यक)

**1. नवोपक्रमचे शीर्षक –**

'व्यावसायिक वाटा... प्रगतीच्या दिशा'

(विविध क्षेत्रातील व्यावसायिकांची मुलाखत)

**2. नवोपक्रमाची गरज व महत्त्व**

विद्यार्थी दहावी मध्ये आला कि पालकांपुढे प्रश्न उभा राहतो 'आता पुढे काय?'. दहावी नंतर काय या प्रश्नाने विद्यार्थी पालक गोंधळलेले असतात. त्याने पुढे काय करावे?, कोणता अभ्यासक्रम निवडावा?, कशात करिअर करावे?, तो/ती कशात यशस्वी होऊ शकेल, एक ना अनेक प्रश्न पालकांसमोर असतात. यासाठी  काही पालक पाल्याच्या परीक्षेतील गुणांच्या टक्केवारी वर त्याचे पुढचे करिअर मार्ग निवडतात. उदाहरणार्थ ८०% व त्यापुढचे विज्ञान घेऊन पुढे वैद्यकीय अभियांत्रिकी या ठरलेल्या वाटेकडे पाठवितात, तर काही पालक पाल्याला ६५-७९% पर्यंत गुण मिळाल्यास वाणिज्य शाखा देऊन सी.ए./सी.एस. या वाटेकडे वळवतात. ५०% च्या पुढे प्राप्त गुणांच्या आधारे कला व मानव्यविद्या शाखेकडे जाण्यास सांगतात. परंतु हा मार्ग कितपत योग्य होता हे जेव्हा ते मूल निवडलेल्या अभ्यासक्रमामध्ये समाधानी नसते, अभ्यासक्रम पूर्ण करू शकत नाही तेव्हा पालकांच्या लक्षात येते. तोपर्यंत बऱ्यापैकी उशीर झालेला असतो. वेळ, पैसा आणि श्रम या तीनही बाबींचा अपव्यय होतो. विद्यार्थी पालक जेव्हा समुपदेशानाकरिता प्रत्यक्ष यायचे किंवा दूरध्वनी द्वारे मार्गदर्शन मागायचे तेव्हा या बाबी एक समुपदेशक म्हणून प्रकर्षाने जाणवायच्या. यावर काहीतरी ठोस असा एखादा उपक्रम राबवावा, जेणे करून विद्यार्थ्यांना त्यांच्या पुढील अभ्यासक्रम निवडीस मदत होईल. हा विचार माझ्या मनात सारखा घोळत होता. कोविडच्या प्रादुर्भावामुळे सर्व बाबी या ऑनलाईन सुरु होत्या. पालक व विद्यार्थ्यांना करिअर निवडीबाबत उपयुक्त ठरेल असा नवीन उपक्रम राबविण्याबाबत मी प्रादेशिक विद्या प्राधिकरण मुंबईच्या उपसंचालक व व्यवसाय मार्गदर्शन अधिकारी यांच्याशी चर्चा केली. तदनंतर व्यावसायिक तज्ज्ांची

ऑनलाईन मुलाखत घेण्याचे ठरविले. वेगवेगळ्या व्यवसायात काम करणारे व्यावसायिक यांनी प्रादेशिक विद्या प्राधिकरण, मुंबई च्या ऑनलाईन मंचावर आमंत्रित करून त्यांची मुलाखत घेण्याचे योजण्यात आले.

**3. नवोपक्रमाची उद्दिष्टे**

1. विद्यार्थी, शिक्षक, पालक यांना विविध व्यवसायाची माहिती देणे.
2. विद्यार्थी, शिक्षक, पालक यांना व्यवसायासाठी आवश्यक पात्रता - अर्हता, व्यवसायाचे स्वरूप, अडचणी, धोके, व्यवसाय संधी, इत्यादी माहिती प्रत्यक्ष त्या क्षेत्रात काम करणाऱ्या अनुभवी व्यक्तीच्या मुलाखतीतून देणे.
3. शासनाच्या महाकरिअर पोर्टलची माहिती देणे.

सदर उपक्रमामधून इयत्ता ९ वी ते १२ वी च्या विद्यार्थ्यांना याचा फायदा होईल. त्याचबरोबर पालक, शिक्षक यांना देखील हा उपक्रम फायदेशीर आहे. प्रत्यक्ष अनुभवामधून व्यावसायिक आपले अनुभव मुलाखतीमधून देणार असल्यामुळे पालकांना आपल्या पाल्यासाठी अभयासक्रम निवडी करीत मदत होईल. तसेच शासनाचे महाकरिअर पोर्टल यातील विस्तृत माहिती बघण्याकरिता मुलाखतकार विद्यार्थ्यांना आवाहन करतील.

**4. नवोपक्रमाचे नियोजन**

**i) उपक्रमपूर्व स्थितीचे निरीक्षण**

उपक्रम सुरु करण्यापूर्वी ऑनलाईन शिक्षण सुरु होते. विद्यार्थ्यांना विशेषतः १०-१२ वी इयत्तांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना, त्यांच्या पालकांना पुढील अभ्यासक्रम निवडीबाबत समस्या जाणवत होत्या. तसे मार्गदर्शन घेण्याकरिता येणाऱ्या दूरध्वनीवरून ही बाब लक्षात येत होती. विद्यार्थ्यांना करिअरची माहिती देणारे महाकरिअर पोर्टल आहे. त्यात अनेक करिअरची विस्तृत माहिती आहे. यासोबतच S.C.E.R.T., पुणे यांनी मार्गदर्शन/समुपदेशन करीता महाराष्ट्रातील I.V.G.S. समुपदेशकांची यादी वेबसाईटवर प्रसिद्ध केलेली आहे. S.C.E.R.T. च्या यूट्यूब चॅनेल वरून करिअर विषयक वेबिनार सत्राचे आयोजन

करण्यात येत होते. यासोबतच विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष त्या क्षेत्रात काम करणाऱ्या व्यक्तीने माहिती दिली तर ती फर्स्ट हॅन्ड माहिती ठरेल, असे वाटले म्हणून सदर तज्ज्ञ मार्गदर्शकांची ऑनलाईन मुलाखत घेण्याचे ठरवले.

**ii) संबंधित व्यक्तींशी, तज्ज्ञांशी चर्चा**

सर्वप्रथम उपसंचालक, व्यवसाय मार्गदर्शन अधिकारी यांच्याबरोबर उपक्रमाबाबत चर्चा केली. हा उपक्रम एक वर्ष राबवण्यासाठी साधारण काय नियोजन असावे, प्रत्यक्ष उपक्रम कसा राबवायचा, या साठी कोणा-कोणाची मदत घेता येईल इत्यादी बाबींवर चर्चा झाली. त्यानंतर प्राधिकरणातील अधिकारी, कर्मचारी, विषय सहाय्यक, साधन व्यक्ती व I.V.G.S. समुपदेशक यांची ऑनलाईन बैठक घेऊन उपक्रमाची माहिती, महत्त्व व प्रत्यक्ष सहभागाबाबत आवाहन करण्यात आले. तसेच या उपक्रमाला काय नाव द्यावे यावर देखील चर्चा झाली. त्यानंतर या उपक्रमाला 'व्यावसायिक वाटा... प्रगतीच्या दिशा' हे नाव सर्वानुमते निश्चित झाले. या बैठकीत उपस्थित ८०% व्यक्तींनी सदर उपक्रमात स्वप्रेरणेने सहभागी होण्याची तयारी दर्शविली.

**iii) आवश्यक साधनांचा विचार**

हा उपक्रम म्हणजेच ऑनलाईन मुलाखत घेण्याकरिता स्मार्टफोन, लॅपटॉप, इंटरनेट सुविधा, मुलाखत देणारी तज्ज्ञ व्यक्ती, मुलाखतकार, मुलाखत यूट्यूबला प्रसारित करण्यासाठी तंत्रस्नेही सहाय्यक, इत्यादी बाबांची आवश्यकता होती.

**iv) करावयाच्या कृतींचा क्रम :**

- मुलाखतीकरीता करिअर विषयांची निश्चिती केली.
- त्या करिअर मध्ये काम करणाऱ्या व्यक्तींची निवड व त्यांची मुलाखतीकरीता उपलब्धता बघितली.

- मुलाखतकार ठरविले.
- मुलाखत निर्दोष व्हावी, माहितीपूर्ण व्हावी म्हणून प्रसारणापूर्वी सराव मुलाखत घेतली जायची. त्याचे रेकॉर्डिंग पुनरावलोकन समितीकडे पाठविले जायचे. त्याचे अवलोकन करून, सर्व त्रुटी दूर करून, आवश्यकतेनुसार पुन्हा ती मुलाखत नव्याने घेतली जायची, नंतरच तिचे प्रसारण वेळापत्रकानुसार व्हायचे.
- मुलाखतीची जाहिरात/पोस्ट तयार करून ती संबंधित विविध ग्रुपमध्ये पाठविली जायची.
- मुलाखत प्रभावी होण्याकरिता, ती विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचण्यासाठी वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली मुलखातकारांची ऑनलाईन बैठक घेऊन त्यांना वेळोवेळी मार्गदर्शन करण्यात आले.

**v) उपक्रमोत्तर स्थितीचे निरीक्षण**

सन २०२१-२२ मध्ये सदर उपक्रम राबविला. लॉकडाऊन कालावधीत विद्यार्थ्यांना व पालकांना प्रत्यक्ष अनुभवी तज्ज्ञांच्या बोलातून करिअर विषयक माहिती फर्स्ट हॅन्ड मिळाली. विद्यार्थ्यांना विविध व्यवसायांची माहिती नव्याने मिळाली. त्याचा उपयोग त्यांना अभ्यासक्रम निवडीसाठी झाला असे अभिप्राय विद्यार्थ्यांनी दिले. समुपदेशकांना एकाच वेळी अनेक विद्यार्थ्यांशी संवाद साधण्याची संधी मिळाली.

**vi) कार्यवाहीचे टप्पे वेळापत्रक**

| अ. क्र. | कार्यवाहीचे टप्पे | तपशील |
|---|---|---|
| १ | नवोपक्रम निश्चिती | दिनांक २४/०४/२०२१ |
| २ | कार्यालयातील वरिष्ठांशी चर्चा | दिनांक २४/०४/२०२१ |
| ३ | ऑनलाईन बैठक (अधिकारी, समुपदेशक, विषय सहाय्यक, साधनव्यक्ती) | दिनांक २६/०४/२०२१ |
| ४ | साधनांची उपलब्धता | दिनांक २६/०४/२०२१ |
| ५ | व्हाट्सअँप ग्रुप निर्मिती | |

| अ. क्र. | कार्यवाहीचे टप्पे | तपशील |
|---|---|---|
| १ | मुलाखतकारांचा ग्रुप | दिनांक २६/०४/२०२१ |
| २ | मुलाखत पूर्वावलोकन | दिनांक ०२/०५/२०२१ |
| ६ | मुलाखत सराव | मुलाखात प्रसारणापूर्वी साधारण एक आठवडा |
| ७ | मुलाखतीचे प्रसारण | प्रत्येक आठवड्याला तीन दिवस सोम,  बुध, गुरु |
| ८ | उपक्रमोत्तर निरीक्षण (मुलाखतकारांशी ऑनलाईन चर्चा) | प्रत्येक महिन्याच्या शेवटच्या आठवडयात |
| ९ | अहवाल लेखन | दिनांक २९/०४/२०२२ व ३०/०४/२०२२ |

**vii) उपक्रमासाठी इतरांची मदत :**

१) सदर उपक्रम प्रभावी होण्याकरिता अनेकांची मदत महत्वपूर्ण ठरली.

२) वरिष्ठांचे मार्गदर्शन-सदर उपक्रमासाठी वरिष्ठ अधिकारी माझे सहकारी विषय सहाय्यक IVGS समुपदेशक, विशेष व विषय साधन व्यक्ती यांची मदत झाली.

३) मुलाखतकार -सदर उपक्रमाकरिता १०२ मुलाखती घेण्यात आल्यात. या मुलाखती घेण्याकरिता तज्ञ व्यक्तींचा शोध घेणे, त्यांना त्या विषयाचे महत्त्व पटवून देणे, त्यांची सराव मुलाखत घेणे, प्रत्यक्ष मुलाखत घेऊन ती प्रसारित करणे, मान्यवरांना त्यांनी दिलेल्या मुलाखतीकरिता धन्यवाद आभारपर विशेष संवाद साधणे. ही कार्य संस्कृती सर्व सहभागींनी दाखविली. या सर्वांच्या मनस्वी प्रयत्नांमुळेच हा उपक्रम यशस्वी होऊ शकला.

४) पुनरावलोकन समिती-पुनरावलोकन समिती तयार करण्यात आली. यात मा. उपसंचालक मा.व्यवसाय मार्गदर्शन अधिकारी, कार्यालयातील समुपदेशक यांचा सहभाग होता. ही समिती मुलाखतीचे अवलोकन करून आपला अभिप्राय द्यायची. या अभिप्रायानंतर मुलाखत प्रसारित व्हायची.

५) तांत्रिक सहाय्य-मुलाखत घेतल्यानंतर ती प्रादेशिक विद्या प्राधिकरण मुंबई या यूट्यूब चॅनल वर प्रसारित करण्याचे महत्त्वाचे काम या कार्यालयातील श्री शिवाजी रेणापूरे विषय सहाय्यक व माझ्या कुटुंबातील सदस्य ऋत्विज जोशी, तन्मय देशपांडे व अंबरिश जोशी यांनी केले.

viii) **उपक्रमासाठी सादर करावयाचे पुरावे :**

- ❖ ऑनलाइन मीटिंगचे इतिवृत्त
- ❖ ग्रुप निर्मिती
- ❖ सर्व मुलाखती प्रादेशिक विद्या प्राधिकरण मुंबईच्या यूट्यूब चॅनल वर उपलब्ध यूट्यूब चॅनलची लिंक

https://youtube.com/@user-co७wk९fo४n

- ❖ मुलाखत देणाऱ्या काही निवडक व्यक्तींचा अभिप्राय
- ❖ मुलाखतकार यांच्या मुलाखतीबाबतीचा अनुभव - ऑनलाईन व्हिडिओ
- ❖ विद्यार्थी, पालक यांच्या उपक्रमाबाबतच्या प्रतिक्रिया- व्हिडिओ
- ❖ मुलाखत प्रश्नावली

(सदर पुरावे परिशिष्टामध्ये जोडले आहेत)

## 5. नवोपक्रमाची कार्यपद्धती

I) **पूर्वस्थितीची निरीक्षणे व त्यांच्या नोंदी.**

कोरोनाचे सावट होते. अनेकांचे रोजगार गेले होते. मुले ऑनलाइन शिकत होते. मुलांनी दहावी बारावी नंतर काय करावे. कोणते क्षेत्र निवडावे, कोणते करिअर निवडावे हा प्रश्न विद्यार्थ्यांबरोबरच पालकांना देखील होता. मी एक समुपदेशक असल्यामुळे या प्रश्नाचे गांभीर्य मला कळत होते. त्यामुळेच करिअर बाबत कोणकोणत्या बाबी उपलब्ध आहे. याचा अभ्यास केला.

करिअर मार्गदर्शन विषयी असणाऱ्या साहित्याचे अवलोकन केले. यात वर्तमानपत्रातील लेख, युट्युबवरील करिअर विषयक कार्यक्रम, शासनाचा महाकरिअर पोर्टल विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध होते, हे

पोर्टल वापरण्याबाबत विद्यार्थ्यांमध्ये जागृती करणे सुरू होतं. या सर्व पार्श्वभूमीवर विविध करिअर विषयक माहिती प्रत्यक्ष त्या करिअरमध्ये काम करणाऱ्या व्यक्तीने दिली तर ते खूप प्रभावी व उपयोगाचे होईल असे वाटले.

### II) कार्यवाही दरम्यान केलेली निरीक्षणे व माहिती संकलन

'व्यावसायिक वाटा .....प्रगतीच्या दिशा' हा एक तज्ज्ञ व्यक्ती, स्वत: करीत असलेल्या करिअर बाबतची माहिती सांगणारा कार्यक्रम होता. यात अर्थातच त्या व्यक्तीने आपल्या अनुभवाच्या आधारे त्या करिअरची संपूर्ण माहिती देणे अपेक्षित होते. त्या करिअर साठी लागणारी पात्रता, व्यावसायिक शिक्षण, कामाचे स्वरूप, करिअरमध्ये असणारे अडथळे त्यावर केलेली मात, व्यवसाय वृद्धी, यशस्विता इत्यादी बाबत फर्स्ट हँड माहिती देत असे. यामुळे या मुलाखती रचनाबद्ध होत्या. या मुलाखतीमधील प्रश्नांची पूर्व निश्चिती करण्यात आलेली होती. तथापि मुलाखत घेताना मुलाखतकाराला ऐनवेळी सुचलेले मुद्दे किंवा मुलाखत देणाऱ्या मान्यवरांच्या बोलण्यातून आलेल्या मुद्द्यांवर पूरक प्रश्न देखील विचारण्यात आले. अपवादात्मक मुलाखतीमध्ये विषयाच्या अनुषंगाने वेगळे प्रश्न देखील विचारण्यात आले.

मुलाखत निर्दोष व माहितीपूर्ण व्हावी. म्हणून प्रसारणापूर्वी सराव मुलाखत घेतली जायची त्याचे रेकॉर्डिंग करून ती पूर्वावलोकन समितीकडे पाठवली जायची. त्याचे अवलोकन करून सर्व त्रुटी दूर करून आवश्यकता भासल्यास पुन्हा ती मुलाखत नव्याने घेतली जायची नंतरच तिचे प्रसारण प्रादेशिक विद्या प्राधिकरण मुंबईच्या यूट्यूब चॅनल वर https://youtube.com/@user-co७wk९fo४n वेळापत्रकानुसार व्हायचे. मुलाखती पाहिल्यानंतर विद्यार्थी, पालक, शिक्षक यांना काही शंका असल्यास त्या डिस्क्रिप्शन बॉक्समध्ये दिलेल्या कार्यालयाचा ई-मेल आयडी वर पाठविण्याबाबत आवाहन केल्या जायचे. या मुलाखतींना मिळालेल्या प्रतिसादाच्या नोंदी ठेवलेल्या आहेत. मुलाखत घेताना घ्यावयाची

काळजी, सूचना अगोदरच वेळोवेळी सांगितल्या जायच्या. त्याचप्रमाणे मुलाखत देणाऱ्या व्यक्तीस देखील तांत्रिक बाजू तसेच त्यांच्याकडून करिअर ची माहिती देताना असलेली अपेक्षा या उपक्रमाचे महत्व याबाबत अगोदरच संवाद साधला जायचा. मुलाखत देणाऱ्या मान्यवरांच्या अडचणी समजून घेऊन जसे त्यांची उपलब्धता, नेटवर्क बाबत समस्या इत्यादीचा विचार करून मुलाखतकार मुलाखती घ्यायचे. काही मुलाखती या उशिरा रात्री देखील घेतलेल्या आहेत.

**III) उपक्रम पूर्ण झाल्यावर केलेली निरीक्षणे व त्यांच्या नोंदी**

हा ऑनलाईन मुलाखतीचा कार्यक्रम ३ मे २०२२ रोजी सुरू झाला. प्रत्येक आठवड्याला सोमवार बुधवार व गुरुवार रोजी सकाळी १० वाजता प्रादेशिक विद्या प्राधिकरणाच्या यूट्यूब चैनल वर प्रसारित व्हायच्या. कार्यालयीन कामाच्या व्यस्ततेमुळे सदर उपक्रम माहे नोव्हेंबर, २०२१ पासून आठवडयात एक दिवस दर गुरुवारी प्रसारित करण्यात आला. या उपक्रमांतर्गत एकूण १०२ मुलाखती प्रसारित झाल्यात. सदर मुलाखती देण्यासाठी त्या त्या क्षेत्रातील तज्ज्ञ मान्यवर आलेत. जसे इलेक्ट्रॉनिक मीडियाची माहिती देण्याकरिता श्रीमती. भारती सहस्त्रबुद्धे, हेड प्लॅनिंग अँड प्रोग्रामिंग एबीपी माझा, कला दिग्दर्शन - श्री सुमित पाटील, दिग्दर्शक. पर्यटन क्षेत्रातील संधी-श्रीमती नीला लाड, निवृत्त निदेशक मध्य व पश्चिम भारत पर्यटन मंत्रालय भारत सरकार. कला क्षेत्रातील संधी - श्री पुरुषोत्तम बेर्डे सिने लेखक व दिग्दर्शक. अभियांत्रिकी क्षेत्रातील करिअर संधी -श्री नितीन गुल्हाने प्राध्यापक व्ही.जे.टी.आय., कृषी क्षेत्रातील करिअर - डॉ. संतोष थिटे, कृषी व्यावसायिक. प्रिंट मीडिया - श्री अतुल कुलकर्णी, संपादक लोकमत. दिव्यांगांसाठी स्वयंरोजगार भाग १व२ -डॉक्टर सुधा दळवी तेंडुलकर अस्मिता प्रकल्प प्रमुख व तेथील कर्मचारी अशा नामवंत व्यक्तींनी या मुलाखती दिलेल्या आहेत. त्यांनी हा उपक्रम अतिशय उपयुक्त

असल्याचा अभिप्राय आपल्या मुलाखतीत व्यक्त केला आहे. सदर कार्यक्रम विद्यार्थी, पालक, शिक्षक यांच्यापर्यंत पोहोचण्याकरिता विविध ग्रुपमध्ये पाठविला आहे.

साधारणपणे ४३ हजार इतक्या लोकांपर्यंत हा उपक्रम पोहोचलेला आहे. हा कार्यक्रम सुरू झाला तेव्हा चॅनलचे सबस्क्राईबर दोन हजारापर्यंत होते. नंतर ही संख्या साडेसहा हजाराच्या वर गेली.

**IV) कार्यवाही करताना आलेल्या अडचणी**

- ❖ मुलाखती करिता निवडलेल्या व्यक्तींची त्यांच्या उपलब्ध वेळेनुसार मुलाखत घेणे, मुलाखतीचा सराव घेऊन त्यात झालेल्या त्रुटी संबंधितांना सांगून पुन्हा मुलाखत घेणे हे एक जिकरीचे काम होते परंतु यात मान्यवर व मुलाखतकार दोघांनीही चांगले सहकार्य दाखवले.
- ❖ मुलाखत अपलोड करताना त्याची साईज मोठी असल्यास तो अपलोड करण्यास खूप वेळ लागायचा. या परिस्थितीत तो व्हिडिओ त्या व्हिडिओची साईज कमी करणे. व्हिडिओतील अनावश्यक भाग एडिट करणे. इत्यादी अडचणीचा भाग होता. परंतु तांत्रिक सहाय्य करणाऱ्या व्यक्तींनी स्वतःचे काम सांभाळून हे काम विना मोबदला करून दिले.
- ❖ या उपक्रमास कोणतीही तरतूद मंजूर नसल्यामुळे तज्ञ मार्गदर्शकांना, मुलाखतकार यांना कोणत्याही प्रकारचा आर्थिक मोबदला दिल्या गेला नाही. परंतु ते संस्थेकरिता मुलांकरिता शिक्षक व पालकांकरिता सदर मुलाखत देण्यास तयार झाले.
- ❖ मुलाखतकार यांना सतत प्रोत्साहित ठेवणे हे देखील जिकरीचे काम होते पण त्यांनी अध्यापनाचे वेळापत्रक सांभाळून या उपक्रमास सहकार्य केले.

### ६) नवोपक्रमाची यशस्विता / फलनिष्पत्ती (उद्दिष्टांनुसार)

- ❖ या उपक्रमांमधून विविध व्यवसायाचे नेमके स्वरूप, पात्रता, व्यावसायिक शिक्षण, त्या व्यवसायाची सद्यस्थिती, त्यातील अडथळे धोके, त्यावर कशी मात करता येईल, त्या व्यवसायाची वृद्धी, यशस्विता इत्यादीची माहिती व पुढे जाऊन त्याचे व्यवहारात उपयोजन करण्याची संधी विद्यार्थी पालक शिक्षक समुपदेशक यांना मिळाली.
- ❖ हा उपक्रम कायमस्वरूपी युट्युब वर उपलब्ध आहे. त्यामुळे भविष्यात देखील प्रेक्षक त्यांच्या गरजेनुसार हा कार्यक्रम बघू शकतात.
- ❖ सदर उपक्रम विना खर्च (zero Budget) राबविला.
- ❖ या उपक्रमामुळे प्रादेशिक विद्या प्राधिकरण मुंबई या संस्थेला अनेक तज्ज्ञ मान्यवर जोडल्या गेले. त्यामुळे सद्यस्थितीत व भविष्यात त्यांचा ज्ञानाचा उपयोग विना मोबदला संस्थेस घेता येईल.
- ❖ IVGS समुपदेशक या उपक्रमामुळे संस्थेशी पुनश्च जोडले गेले.
- ❖ ही मुलाखत ऑनलाईन घ्यायची असल्यामुळे मुलाखतकार काही प्रमाणात तंत्रस्नेही झालेत.

### ७) समारोप

सदर 'व्यावसायिक वाटा.....प्रगतीच्या दिशा' तज्ज्ञ मार्गदर्शकाच्या मुलाखती या उपक्रमाद्वारे विद्यार्थ्यांना अभ्यासक्रम करियर निवडण्यास निश्चितपणे मदत झाली व हे उपक्रम यूट्यूब चॅनल वर कायमस्वरूपी असल्यामुळे भविष्यात देखील विद्यार्थ्यांना याचा फायदा होणार आहे असे म्हणावयास वाव आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२२ मध्ये व्यावसायिक शिक्षणाला महत्त्वाचे स्थान दिलेले आहे. भविष्यामध्ये कृषी, वैद्यकीय, कायदा व माहिती तंत्रज्ञान या क्षेत्रांना विशेष महत्त्व असणार आहे. तसा उल्लेख या धोरणामध्ये आहे. या विषयावरील मुलाखती देखील या उपक्रमामध्ये समाविष्ट आहेत. त्याचा उपयोग नक्की शिक्षक पालक व विद्यार्थ्यांना सद्यस्थितीत व भविष्यात होईल.

८) संदर्भसूची व परिशिष्टे

१) व्यावसायिक वाटा.... प्रगतीच्या दिशा (मुलाखतींचा तपशील) https://youtube.com/@user-co७wk९fo४n

| अ. क्र. | दिनांक | विषय | मुलाखत देणारे मान्यवर | मुलाखतकार |
|---|---|---|---|---|
| १ | ०३-०५-२०२१ | इलेक्ट्रॉनिक मीडिया | श्रीमती भारती सहस्त्रबुध्दे हेड प्लॅनिंग अँड प्रोग्रामिंग एबीपी माझा | श्रीमती अर्चना जोशी समुपदेशक |
| २ | ०५-०५-२०२१ | कला दिग्दर्शन चित्रपट आणि दूरचित्रवाणी | श्री. सुमीत पाटील, कलादिग्दर्शक चित्रपट आणि दूरचित्रवाणी | श्रीमती लक्ष्मी शिंदे समुपदेशक |
| ३ | ०६-०५-२०२१ | सॉफ्टवेअर क्षेत्रातील संधी | श्री. सुरेश बोरसे, व्यवस्थापक डायरेक्शन सॉफ्टवेअर सोलुशन | श्री. महेशकुमार बोरसे समुपदेशक |
| ४ | १०-०५-२०२१ | पर्यटन क्षेत्रातील संधी | श्रीम. नीला लाड, निवृत्त क्षेत्रीय निदेशक, मध्य व पश्चिम भारत, पर्यटन मंत्रालय भारत सरकार | १) श्रीमती मृणाल पोतदार अधिक्षक<br>२) श्रीम. वैशाली काकडे विषय सहाय्यक |
| ५ | १२-०५-२०२१ | परिचारिका (नर्सिंग) क्षेत्रातील संधी | श्रीम. रेणुका शेटये, परिचारिका (Nurse) जे. जे. हॉस्पीटल, मुंबई | श्रीम. नीता सावंत समुपदेशक |
| ६ | १३-०५-२०२१ | फोटोग्राफी क्षेत्रातील संधी | श्री. कौस्तुभ काळे Fashion and Food Photographer | श्रीमती सायली कदम समुदेशक |
| ७ | १७-०५-२०२१ | नृत्य दिग्दर्शन क्षेत्रातील संधी | श्रीम. स्नेहा पोतदार नृत्य दिग्दर्शिका | श्रीम. वैशाली काकडे विषय सहाय्यक |
| ८ | १९-०५-२०२१ | दंतवैद्यक क्षेत्रातील संधी | श्रीम. सुषमा सोनावणे Other Dentist | श्रीम. प्रतिभा केसरकर समुपदेशक |

| अ. क्र. | दिनांक | विषय | मुलाखत देणारे मान्यवर | मुलाखतकार |
|---|---|---|---|---|
| ९ | २०-०५-२०२१ | कला क्षेत्रातील संधी | श्री. पुरुषोत्तम बेर्डे सिनेलेखक व दिग्दर्शक | श्री. दयानंद शिनगारे समुपदेशक |
| १० | २४-०५-२०२१ | औषध निर्माण शास्त्र क्षेत्रातील व्यवसाय | श्री. शिरीष अंबुलगेकर Assistant Vice President Sun Pharma | श्रीम. वैशाली काकडे विषय सहाय्यक |
| ११ | २६-०५-२०२१ | क्रीडा क्षेत्रातील व्यवसाय संधी | श्री. अमेय कोळेकर (Sport Scientist) | श्रीम. स्मिता शिपुरकर समुपदेशक |
| १२ | २७-०५-२०२१ | सागरी अभियांत्रिकी क्षेत्रातील व्यवसाय | श्री. सुमित कुमार (Enginner in Marine Cargo) | श्रीम. प्रतिभा केसरकर समुपदेशक |
| १३ | ३१-०५-२०२१ | कायदा क्षेत्रातील करिअर संधी | श्रीमती. उपासना पांडे Advocate High Court Mumbai | श्रीमती. सजीता सुधीर समुपदेशक |
| १४ | ०२-०६-२०२१ | अभियांत्रिकी क्षेत्रातील करिअर संधी भाग - १ | डॉ. श्री. नितीन गुल्हाने प्राध्यापक व्ही. जे. टी. आय. | श्री. दयानंद शिनगारे समुपदेशक |
| १५ | ०३-०६-२०२१ | अभियांत्रिकी क्षेत्रातील करिअर संधी भाग - २ | डॉ. श्री. नितीन गुल्हाने प्राध्यापक व्ही. जे. टी. आय. | श्री. दयानंद शिनगारे समुपदेशक |
| १६ | ०७-०६-२०२१ | निवेदन क्षेत्रातील करिअर संधी | श्री. अमिराम सराफ निवेदक आकाशवाणी सोलापूर | श्रीमती. अर्चना जोशी समुपदेशक |
| १७ | ०९-०६-२०२१ | यंत्र अभियांत्रिकी क्षेत्रातील व्यवसाय संधी | श्री. अनंत रामचंद्र कदम व्यावसायिक (Press tool / Design / Production All Cng Machine) | श्रीमती. नीता सावंत समुपदेशक |
| १८ | १०-०६-२०२१ | सल्लागार भारतीय आयुर्विमा महामंडळ | श्री. चंद्रहास रहाटे LIC Advisor & Financial Planner | श्रीमती. सजीता सुधीर समुपदेशक |
| १९ | १४-०६-२०२१ | कृषी क्षेत्रातील संधी | डॉ. संतोष थिटे (कृषी व्यावसायिक) | श्री. शिवाजी रेणापूरे विषय सहाय्यक |

| अ. क्र. | दिनांक | विषय | मुलाखत देणारे मान्यवर | मुलाखतकार |
|---|---|---|---|---|
| २० | १६-०६-२०२१ | मनुष्यबळ व्यवस्थापन क्षेत्रातील व्यवसाय संधी | श्री. नचिकेत नायडू Asst Manager at ITC Ltd Human Resources | श्री. सय्यद ताहेरा शकील समुपदेशक |
| २१ | १७-०६-२०२१ | सनदी लेखापाल व्यवसाय संधी | श्री. बालन नारायण C.A. | श्रीमती. सजीता सुधीर समुपदेशक |
| २२ | २१-०६-२०२१ | सौंदर्य प्रसाधन क्षेत्रातील व्यवसाय संधी | श्रीमती. नम्रता नाईक ब्यूटिशियन | श्रीम. रेश्मा शेळके समुपदेशक |
| २३ | २३-०६-२०२१ | औषध निर्माण क्षेत्रातील व्यवसाय संधी | डॉ. श्री. प्रकाश खेबुडकर Gov. of Maharashtra Health Department as Chief Pharma Officer | श्री.यतिन पोळ समुपदेशक |
| २४ | २४-०६-२०२१ | अन्न प्रक्रिया उद्योगातील व्यवसाय संधी | श्री. महेशकुमार अंबुरे युनिट मॅनेजर, अंबुरे फुड्स, उस्मानाबाद | श्री. विनोद घोरपडे विषय सहाय्यक |
| २५ | २८-०६-२०२१ | रेल्वे लोके पायलट क्षेत्रातील व्यवसाय संधी | श्री. शशिकांत राऊत रेल्वे लोको पायलट (चालक) | श्रीम. मानसी भोसले विषय सहाय्यक |
| २६ | ३०-०६-२०२१ | परिचर्या शिक्षण क्षेत्रातील व्यवसाय संधी | डॉ. निलिमा मोर अधिष्ठाता भारती विद्यापीठ सांगली | श्रीम. अनुजा कदम समुपदेशक |
| २७ | ०१-०७-२०२१ | उद्योजकता क्षेत्रातील संधी | बिपिन जगताप Deputy Chief Executive Officer | श्रीम. वैशाली काकडे विषय सहाय्यक |
| २८ | ०५-०७-२०२१ | गुंतवणूक क्षेत्रातील व्यवसाय संधी | श्री. संदीप बारवकर (Investment Expert) | श्रीमती. मानसी भोसले विषय सहाय्यक |
| २९ | ०७-०७-२०२१ | करिअर इन आय आय एम (I I M) MBA | श्री. कैफ सिध्दकी Sales Director India | श्री. अन्सारी मोहम्मद आमिर समुपदेशक |
| ३० | ०८-०७-२०२१ | वृत्तपत्र क्षेत्रातील व्यवसाय संधी | श्री. अतुल कुलकर्णी संपादक लोकमत | श्रीमती. अर्चना जोशी समुपदेशक |

| अ. क्र. | दिनांक | विषय | मुलाखत देणारे मान्यवर | मुलाखतकार |
|---|---|---|---|---|
| ३१ | १२-०७-२०२१ | पटकथा लेखन क्षेत्रातील व्यवसाय संधी | श्री. ऋत्विक थेटे Script Writer & Assistant Director | श्रीमती. नम्रता परब विषय सहाय्यक |
| ३२ | १४-०७-२०२१ | नृत्य व अभिनय क्षेत्रातील करिअर संधी | श्रीमती. मापा जाधव (नृत्य समशेर लावणी सम्राज्ञी) | श्रीमती शितल शिर्के विषयतज्ज्ञ |
| ३३ | १५-०७-२०२१ | करिअर इन होमिओपॅथी | श्रीमती. डॉ. पूनम आलतेकर | श्रीम. प्रतिभा केसरकर समुपदेशक |
| ३४ | १९-०७-२०२१ | इलेक्ट्रॉनिक व दूरसंचार क्षेत्रातील व्यवसाय | श्रीमती रुपाली कोरे Station Controller at Mumbai Metro | श्रीम. स्नेहा अमित चव्हाण समुपदेशक |
| ३५ | २१-०७-२०२१ | समाजकार्य क्षेत्रातील करिअर संधी | श्रीमती. राजश्री तिखे Education Advisor for BAIF | श्रीमती. अर्चना जोशी समुपदेशक |
| ३६ | २२-०७-२०२१ | निसर्गोचार क्षेत्रातील करिअर संधी | श्रीमती. मनिषा मांदाडे निसर्गोपचार तज्ज्ञ | श्रीमती. अर्चना जोशी समुपदेशक |
| ३७ | २६-०७-२०२१ | कृषी वैज्ञानिक क्षेत्रातील व्यवसाय संधी | डॉ. विलास सावंत कृषी शास्त्रज्ञ कृषी विज्ञान केंद्र सिंधुदूर्ग | श्रीमती. सजीता सुधीर समुपदेशक |
| ३८ | २८-०६-२०२१ | आयुर्वेद क्षेत्रातील व्यवसाय संधी | श्रीमती. डॉ. प्राची आहेर | श्रीमती. मानसी भोसले विषय सहाय्यक |
| ३९ | २९-०७-२०२१ | आर्थोटिक्स व प्रोस्थेटिक्स क्षेत्रातील करिअर संधी | श्री. अमेय कठाळे | श्रीमती. अर्चना जोशी समुपदेशक |
| ४० | ०२-०८-२०२१ | स्थापत्य अभियांत्रिकी क्षेत्रातील करिअर संधी | श्री. निलेश दरेकर Manager (Godrej & Boyce) | श्रीमती. नम्रता परब विषय सहाय्यक |
| ४१ | ०४-०८-२०२१ | करिअर इन जर्मन लॅग्वेंज | श्रीम. सई कुलकर्णी जर्मन भाषा तज्ज्ञ | श्रीमती. सजीता सुधीर समुपदेशक |

| अ. क्र. | दिनांक | विषय | मुलाखत देणारे मान्यवर | मुलाखतकार |
|---|---|---|---|---|
| ४२ | ०५-०८-२०२१ | करिअर इन स्पोर्टस (कॅरम) | श्री. प्रशांत मोरे कॅरम स्पर्धेत विश्वविजेते | श्रीमती. स्नेहा चव्हाण समुपदेशक |
| ४३ | ०९-०८-२०२१ | करिअर इन कारपेन्टरी | श्री. मुकेश देशमाने कार्यानुभव शिक्षक | श्रीम. मानसी भोसले विषय सहाय्यक |
| ४४ | ११-०८-२०२१ | व्यवस्थापन क्षेत्रातील करिअर संधी | श्री. संकेत भिरुड Assistant Manager Bharat Pertroleum Corporation Limited | श्रीम. सुप्रिया काबंळे समावेशित विषय साधनव्यक्ती |
| ४५ | १२-०८-२०२१ | चित्रकला क्षेत्रातील करिअर संधी | श्री. अमोल पवार Commercial Artist | श्रीम. नम्रता परब विषय सहाय्यक |
| ४६ | १६-०८-२०२१ | फिजियोथेरपी क्षेत्रातील करिअर संधी | श्रीम. आश्लेषा वरळीकर फिजिओथेरपस्ट | श्रीम. रेश्मा शेळके समुपदेशक |
| ४७ | १८-०८-२०२१ | इव्हेंट मॅनजमेंट क्षेत्रातील करिअर संधी | श्रीम. प्रणाली शेम्बेकर इव्हेंट ऑरगनायझर | श्रीम. स्नेहा अमित चव्हाण समुपदेशक |
| ४८ | १९-०८-२०२१ | कॉम्पुटर ग्राफिक्स क्षेत्रातील करिअर संधी | श्री. गीत नांदगावकर Creative Director २D/३D Artist | श्रीम. स्नेहा अमित चव्हाण समुपदेशक |
| ४९ | २३-०८-२०२१ | इलेक्ट्रॉनिक्स क्षेत्रातील करिअर संधी | श्रीम. हसीना नाईक क्वालिटी इंजिनिअर (डिप्लोमा इन इलेक्टॉनिक अॅड टेलीकॅम्युनिकेशन) | श्रीमती. अर्चना जोशी समुपदेशक |
| ५० | २५-०८-२०२१ | जाहिरात क्षेत्रातील करिअर संधी | श्री. गुरुनाथ भडेकर Freee Lancer / Consultant | श्रीमती. स्नेहा चव्हाण समुपदेशक |
| ५१ | २६-०८-२०२२ | संगीत क्षेत्रातील करिअर संधी | श्री. अतुल दिवे गायक व संगीतकार | श्रीमती. अर्चना जोशी समुपदेशक |

| अ. क्र. | दिनांक | विषय | मुलाखत देणारे मान्यवर | मुलाखतकार |
|---|---|---|---|---|
| ५२ | ३०-०८-२०२२ | कृषी क्षेत्रातील करिअर संधी | श्री. महेश व्यवहारे Chemical Engineer Profession Farmer | श्रीमती. अर्चना जोशी समुपदेशक |
| ५३ | ०१-०९-२०२१ | भूदल क्षेत्रातील करिअर संधी (Career in Army) | श्री. संतोष पडवळ, माजी सौनिक तथा महसूल सहय्यक | श्री. महेशकुमार बोरसे समुपदेशक |
| ५४ | ०२-०९-२०२१ | इन्स्टुमेंटेशन अभियांत्रिकी क्षेत्रातील करिअर संधी | श्री. निखील वेलकर मॅनेजर. Thyssenkrupp Industrial Solutions. Pri Limited | श्रीमती. मृणाल पोतदार |
| ५५ | ०६-०९-२०२१ | संगीत क्षेत्रातील करिअर संधी | डॉ. कल्पना रविंद्र पोक्षे Teaching as Music Therapist | श्रीमती. प्रतिभा केसरकर |
| ५६ | ०८-०९-२०२१ | दिव्यांगासाठी स्वयंरोजगाराच्या संधी भाग १ | श्रीमती सुधा दळवी तेंडुलकर प्रकल्प प्रमुख अस्मिता केंद्र मुंबई | श्रीमती. नीता सावंत समुपदेशक |
| ५७ | ०९-०९-२०२१ | दिव्यांगासाठी स्वयंरोजगाराच्या संधी भाग २ | अस्मिता केंद्रातील कर्मचारी व दिव्यांग व्यक्ती | श्रीमती. नीता सावंत समुपदेशक |
| ५८ | १३-०९-२०२१ | योगा/योगशास्त्र क्षेत्रातील संधी | गंगाप्रसाद खरात, राष्ट्रीय उपाध्यक्ष अखिल भारतीय महासंघ | श्रीमती. वैशाली काकडे विषय सहाय्यक |
| ५९ | १५-०९-२०२१ | शिक्षण क्षेत्रातील संधी | विलास पाटील, अध्यापक विद्यालय श्री समर्थ व्यायाम मंदिर, दादर, मुंबई | श्रीमती रामेश्वरी पाटील समुपदेशक |
| ६० | १६-०९-२०२१ | केशभूषा क्षेत्रातील करिअर | श्री. शैलेश सुर्वे हेअर स्टाईलिश अँड मेकअप अर्टिस्ट | श्रीमती. नम्रता परब विषय सहाय्यक |
| ६१ | २०-०९-२०२१ | ध्वनी मुद्रण व संकलन | श्रीमती. स्वाती कुलकर्णी Sound Operator and Recordist | श्री. विनोद घोरपडे विषय सहाय्यक |
| ६२ | २२-०९-२०२१ | सूत्रसंचलन क्षेत्रातील संधी | श्री. महेश अचीन तलवार (लेखक निवेदक, सूत्रसंचालक) | श्रीमती. वैशाली काकडे विषय सहाय्यक |


| अ. क्र. | दिनांक | विषय | मुलाखत देणारे मान्यवर | मुलाखतकार |
|---|---|---|---|---|
| ६३ | २३-०९-२०२१ | क्रीडा क्षेत्रातील व्यवसाय संधी | देवयानी महाडकर, National Player (Skating) | सौ. स्नेहा अजित चव्हाण समुपदेशक व शिक्षीका |
| ६४ | २७-०९-२०२१ | नाविन्यपूर्ण अध्यापनातील करिअर संधी भाग - १ | श्री. दिपक कलढोणे शिक्षक-गायक-संगीतकार-लेखक कवी | श्रीमती. सजीता सुधीर समुपदेशक |
| ६५ | २९-०९-२०२१ | नाविन्यपूर्ण अध्यापनातील करिअर संधी भाग - २ | श्री. दिपक कलढोणे शिक्षक-गायक-संगीतकार-लेखक कवी | श्रीमती. सजीता सुधीर समुपदेशक |
| ६६ | ३०-०९-२०२१ | जनसंवाद आणि पत्रकारित क्षेत्रातील करिअर | श्री. अभिजीत हिरप, वेब एडिटर कॉन्टेन्ट रायटर | श्रीमती. स्नेहा चव्हाण समुपदेशक |
| ६७ | ०४-१०-२०२१ | आयुर्वेद क्षेत्रातील व्यवसाय संधी | श्रीम. वैदय शर्वरी मिशाळ MD (Ayu) | श्रीमती. अर्चना जोशी समुपदेशक |
| ६८ | ०६-१०-२०२१ | संगीत क्षेत्रातील करिअर संधी | श्रीमती. अंजली भालेराव, गायिका | श्रीमती. मानसी भोसले सहा. शिक्षिका |
| ६९ | ०७-१०-२०२१ | प्रशासकीय सेवेतील व्यवसाय संधी | श्रीमती. अंजली पवार उपजिल्हाधिकारी, | श्रीमती. स्नेहा चव्हाण समुपदेशक व शिक्षिका |
| ७० | ११-१०-२०२१ | नोसेनेतील करिअर संधी | श्री. सुनील पानकर इंडियन नेव्ही मधून सेवा निवृत्त | श्री. महेशकुमार बोरसे समुपदेशक |
| ७१ | १३-१०-२०२१ | हवामान शास्त्रतील व्यवसाय संधी | श्रीमती. ज्योती सोनार Scientific Assistant India Meteoralagical Department Pune | श्रीमती. अर्चना जोशी समुपदेशक |
| ७२ | १४-१०-२०२१ | प्रशासकीय सेवेतील करिअर संधी | श्रीमती. कविता जावळे सहाय्यक आयुक्त जि. कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र ठाणे | श्रीमती. स्नेहा चव्हाण समुपदेशक |

| अ. क्र. | दिनांक | विषय | मुलाखत देणारे मान्यवर | मुलाखतकार |
|---|---|---|---|---|
| ७३ | १८-१०-२०२१ | योग क्षेत्रातील करिअर संधी | श्रीमती. प्रांजली फडवणीस संचालिका स्वरुप योगसाधना | श्रीमती. अर्चना जोशी समुपदेशक |
| ७४ | २०-१०-२०२१ | करिअर इन परफार्मिंग आर्ट | श्रीमती. किरण कुलकर्णी कीर्तन विशारद संगीत विशारद | श्रीमती. स्नेहा चव्हाण |
| ७५ | २१-१०-२०२१ | सुलेखनातील करिअर संधी | श्री. अच्युत पालव सप्रसिध्द सुलेनकार | श्रीमती. नीता सावंत समुपदेशक |
| ७६ | २८-१०-२०२१ | संरचनात्मक अभियांत्रिकी क्षेत्रातील करिअर संधी | श्री. शैलेश मोदी संचालक एस. एस. मोदी कन्सल्टंट फर्म | श्रीमती. अर्चना जोशी विषय सहाय्यक |
| ७७ | ०४-१०-२०२१ | ॲनिमेशन क्षेत्रातील करिअर संधी | श्री. विकास लाड Free lancer in Redefine | श्रीमती. स्नेहा चव्हाण समुपदेशक व शिक्षिका |
| ७८ | ११-१०-२०२१ | फिटनेस क्षेत्रातील करिअर संधी | श्री. अमोल दर्गे फिटनेस ट्रेनर | श्रीमती. नीता सावंत शिक्षिका समुपदेशक |
| ७९ | १८-११-२०२१ | महिलांसाठी सैन्यदलातील Dr. पदासाठी संधी | मेजर डॉ. आश्लेषा केळकर | श्रीमती. नीता सावंत समुपदेशक / शिक्षिका |
| ८० | २५-११-२०२१ | शिक्षण क्षेत्रातील संधी | प्रा. जयश्री साकनुरे (व्याख्याता यशवंतराव महाविद्यालय) | श्रीमती. नीता सावंत समुपदेशक, शिक्षिका |
| ८१ | २५-११-२०२१ | डिजिटल मार्केटिंग क्षेत्रातील व्यवसाय संधी | श्री. सुकेश बोराळे (Founder - S Vart Digital Marketing, Solution) | श्रीमती. नम्रता परब विषय सहाय्यक |
| ८२ | ०९-१२-२०२१ | वास्तूकला क्षेत्रातील संधी | श्री. गोपाळ केळकर, Member of Governing Council, वास्तूकला तज्ञ | श्रीमती. नीता सावंत समुपदेशक |
| ८३ | १६-१२-२०२१ | ललित कला क्षेत्रातील व्यवसाय संधी | श्री. संजय सावंत, प्रयोगशील चित्रकार | श्रीमती. नीता सावंत समुपदेशक |

| अ. क्र. | दिनांक | विषय | मुलाखत देणारे मान्यवर | मुलाखतकार |
|---|---|---|---|---|
| ८४ | २३-१२-२०२१ | स्पीच थेरपीस्ट क्षेत्रातील करिअर संधी | श्री. मुन्शी मिन्हाज, स्पिच थेरपिस्ट | श्रीमती. नीता सावंत समुपदेशक |
| ८५ | ३०-१२-२०२१ | फ्रेंच भाषेतील करिअर संधी | श्रीमती. योगिनी मांडवगणे, फ्रेंच विषय तज्ञ | श्रीमती. नीता सावंत समुपदेशक |
| ८६ | ०६-०१-२०२२ | गणवेशधारी सेवा-पोलीसदल | श्री. सागर खरे, पोलीस इन्पेक्टर इन पोलीस मोटार ट्रान्सपोर्ट सेक्शन | श्री. महेशकुमार बोरसे समुपदेशक |
| ८७ | १३-०१-२०२२ | टेक्सटाईल डिझाईन क्षेत्रातील करिअर संधी | श्रीमती. शुभा महाजन टेक्सटाईल डिझााईन तज्ञ | श्रीमती. नीता सावंत समुपदेशक |
| ८८ | २०-०१-२०२२ | वैदयकीय प्रयोगशाळा तंत्रज्ञ क्षेत्रातील संधी | १) श्री. राजेंद्र रजपूत<br>२) श्री. अनिल जाधव<br>मो. ह. विदपालय व परमार कनिष्ठ महाविदयालय, ठाणे | श्रीमती. नीता सावंत समुपदेशक |
| ८९ | २७-०१-२०२२ | हस्तकला क्षेत्रातील संधी | १) श्रीमती. मालती मेहेंदळे<br>२) श्रीमती. अरुणा मोने | श्रीमती. नीता सावंत समुपदेशक |
| ९० | ०३-०२-२०२२ | कंपनी सेक्रेटरी क्षेत्रातील संधी | १) उन्मेश झगडे, कंपनी सेक्रेटरी | श्रीमती. नीता सावंत समुपदेशक |
| ९१ | १०-०२-२०२२ | वैदयकीय मानस शास्त्रातील संधी | प्रज्ञा चौलकर वैदयकीय मानसतज्ज्ञ बेलजियम | श्रीमती. नीता सावंत समुपदेशक |
| ९२ | १७-०२-२०२२ | बांबू आणि केन इंडस्ट्री क्षेत्रातील संधी | मोहन होडावडेकर कार्यकारी संचालक, कोकण बांबू ॲण्ड केन डेव्हलपमेंट सेंटर KONBAC | श्रीमती. नीता सावंत समुपदेशक |
| ९३ | २४-०२-२०२२ | भाषा क्षेत्रातील करिअर संधी | श्री. संकेत सातोपे भाषा तज्ज्ञ (Lingaist) | श्रीमती. अर्चना जोशी समुपदेशक |

| अ. क्र. | दिनांक | विषय | मुलाखत देणारे मान्यवर | मुलाखतकार |
| --- | --- | --- | --- | --- |
| ९४ | ०३-०३-२०२२ | ग्रंथपाल क्षेत्रातील संधी | श्रीमती. मनिषा कडव<br>ग्रंथपाल | श्रीमती. नीता सावंत<br>समुपदेशक |
| ९५ | १०-०३-२०२२ | शासकीय परिवहन क्षेत्रातील संधी | श्रीमती. सीमा खेते<br>इन्स्पेक्टर ऑफ मोटर व्हेईकल | श्रीमती. नीता सावंत<br>समुपदेशक |
| ९६ | १७-०३-२०२२ | पूर्व प्राथमिक क्षेत्रातील संधी | श्रीमती. नंदिनी भावे<br>सन्मित्र मंडळ गोरेगाव पूर्व | श्रीमती नीता सावंत<br>समुपदेशक |
| ९७ | २४-०३-२०२२ | पुरातत्व शिक्षणातील संधी | डॉ. सचिन जोशी पुरातत्व विभाग / डेक्कन कॉलेज पुणे | श्रीमती. नीता सावंत<br>समुपदेशक |
| ९८ | ३१-०३-२०२२ | संस्कृत विषयातील करिअर संधी | श्रीमती. मैथिली पोतनीस<br>संस्कृत भाषा तज्ज्ञ मुंबई विद्यापीठ | श्रीमती. नीता सावंत<br>समुपदेशक |
| ९९ | ०७-०४-२०२२ | वेशभूषा क्षेत्रातील करिअर संधी | श्री. प्रकाश निमकर<br>वेशभूषा तज्ज्ञ | श्रीमती. गीता सावंत<br>समुपदेशक |
| १०० | १४-०४-२०२२ | स्पोर्ट्स मॅनेजमेंटमधील करिअर संधी | श्री. शुभम वेलणकर<br>स्पोर्टस मॅनेजर | श्रीमती. नीता सावंत<br>समुपदेशक |
| १०१ | २१-०४-२०२२ | भारतीय सूचना सेवा यामधील करिअरच्या संधी | श्रीमती. संगीता गोडबोले<br>भारतीय सूचना सेवा अधिकारी, २०१८ बॅच | श्रीमती. नीता सावंत<br>समुपदेशक |
| १०२ | २८-०४-२०२२ | समुपदेशनातील करिअरच्या संधी | श्री. सुदाम कुंभार, माजी प्राचार्य / समुपदेशक<br>शैलेंद्र केंद्र एज्यू. माध्यमिक व कनिष्ठ महाविद्यालय, मुंबई | श्रीमती. नीता सावंत<br>समुपदेशक |

➢ मुलाखत देणाऱ्या मान्यवरांचे अभिप्राय



# Swasthya Veda
Garbhasanskar & Panchakarma Clinic

Reg. No.: I- 44782-A-1
Mobile : 8407931311 / 8407980311

Dr. Mrs. Sharvari S. Mishal
M.D. ( Ayur)

Date: 5/10/2021

मी वैद्य शर्वरी मिशाळ आयुर्वेद तज्ज्ञ असून पुणे येथे पंचकर्म, गर्भसंस्कार, आयुर्वेद चिकित्सा या क्षेत्रात कार्यरत आहे. प्रादेशिक विद्या प्राधिकरण मुंबई यांच्या वतीने सुरु असलेल्या 'व्यावसायिक वाटा - प्रगतीच्या दिशा' या कार्यक्रमात 'आयुर्वेद क्षेत्रातील व्यवसायाच्या संधी' या विषयावर मार्गदर्शन करण्याची संधी मला मिळाली. विद्यार्थी व पालकांना, आयुर्वेद क्षेत्र किती विस्तृत आहे त्या क्षेत्रात अनेक शाखांमध्ये कार्य करण्याची संधी उपलब्ध आहे, यावर माझे मत या निमित्ताने मांडता आले. अनेक देश आयुर्वेद चिकित्सेला प्राधान्य देत आहेत. अनेक क्लिष्ट रोगांवर चिकित्सा, स्वास्थ्यपालन, Preventive medicine, Healthy lifestyle याकडे लोकांचा कल वाढला आहे. आयुर्वेद औषधी चिकित्सा, औषधी निर्माण, cosmetics, पंचकर्म, Research असे विविध शाखांमध्ये प्राविण्य मिळविण्याची संधी विद्यार्थ्यांना उपयोगी ठरू शकते.

प्रादेशिक विद्या प्राधिकरणाच्या या उपक्रमाद्वारे मी स्वतःचे विचार मांडू शकले त्याबद्दल मी त्यांची आभारी आहे. त्यांच्या या स्तुत्य उपक्रमातून आयुर्वेद क्षेत्रात विद्यार्थी अवश्य जातील अशी आशा करते.

Smishal.
Dr. Sharvari S. Mishal
MD ( Ayu)
Garbhasanskar Expert
Swasthya Veda Clinic

ARV ROYALE, Sr. No. 63, Shop No.102-103, Handewadi Road, Hadapsar, Pune - 411 028.
E-mail : sharwarimishal23@gmail.com like us @ www.facebook.com / Garbhasanskar expert

➢ मुलाखत देणाऱ्या मान्यवरांचे अभिप्राय



मी स्नेहा पोतदार, नृत्य दिग्दर्शिका आहे. 'प्रादेशिक विद्या प्राधिकरण मुंबई व्यवसायिक वाटा.. प्रगतीच्या दिशा' या कार्यक्रमात मी नृत्यदिग्दर्शनातील संधी, याविषयी माहिती सादर केली होती, अशी संधी प्राप्त करून दिल्याबद्दल प्रादेशिक विद्या प्राधिकरण मुंबईच्या सर्व टीमचे आभार. आजच्या स्पर्धेच्या युगात मुलांना टिकून रहायचे असेल, तर फक्त पारंपारीक शिक्षण घेऊन चालणार नाही तर, त्यासाठी करिअरच्या वेगवेगळ्या वाटा निवडणे आवश्यक आहे. आणि हीच बाब व्यावसाईक वाटा प्रगतीच्या दिशा हा कार्यक्रम अधोरेखित करतो, त्या त्या क्षेत्रातील तज्ञ मान्यवरांचे व अनुभवा-तून प्राप्त झालेले मार्गदर्शन विद्यार्थ्यांना नक्कीच उपयोगाचे ठरणार आहे. हा उपक्रम जास्तीत जास्त विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न करावा, पुढील वाटचालीसाठी संपुर्ण टीमला शुभेच्छा.

Sneha


स्नेहा पोतदार.

- मुलाखतकार यांच्या मुलाखतीबाबतीचा अनुभव - ऑनलाईन व्हिडिओ




https://drive.google.com/file/d/१GFydFZRGwYFWSYyZjBi३MC६b७rjNPwZv/view?usp=drivesdk

- मुलाखतीबद्दल विद्यार्थ्यांच्या प्रतिक्रिया





https://drive.google.com/file/d/१GZOqTgZYU६tlP-Chcfdis१x५SzPPimC५/view?usp=drivesdk

**मुलाखतीमध्ये विचारले जाणारे प्रश्न:-**

१) या क्षेत्रात करिअर करावे असे तुम्हाला का वाटले?

२) या क्षेत्रात येण्यासाठी कोणत्या क्षमता, पात्रता आवश्यक आहे? कोणते व्यावसायिक शिक्षण घ्यावे लागते?

३) व्यावसायिक शिक्षण संस्थेत प्रवेश कसा घेतला? त्या काळातील प्रवेश प्रक्रिया व आताची प्रवेश प्रक्रिया यात काही फरक आहे का? असल्यास कोणता?

४) आपल्या कामाचे स्वरुप कसे असते?

५) व्यावसायिक विकास कसा होत गेला? व्यावसायिक विकासाठी व्यक्तीमत्वाची काही वेगळी वैशिष्टये आहेत का? कोणती?

६) या क्षेत्रात कामकरताना तुम्हाला कोणती आव्हाने आलीत? व त्यावर तुम्ही कशी मात केली?

७) या क्षेत्रामध्ये करिअर करु इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना तुम्ही काय सांगाल?